| **MHWS100015782022** | **आदेश नि.क्र.१ वर फौ.कि.अर्ज क्र.१९१/२०२२**<br>**(शिवाजी बंडू बळी वि. मुख्याधिकारी नगर पंचायत)**<br>**दिनांक– १७ डिसेंबर २०२२** |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार शिवाजी बंडू बळी यांनी नगर पंचायत अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार त्यांची आई सौ.शशिकला बंडू बळी यांच्या मृत्युची नोंद गैरअर्जदार यांचे कार्यालयात घेण्याचा आदेश होण्यासंदर्भात दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, तो मौजे मालेगांव, ता .मालेगांव जि. वाशिम येथील कायमस्वरूपी रहिवाशी असून त्यांची आई सौ.शशिकला बंडू बळी यांचा मृत्यु दि.२६.०३.१९९० रोजी मौजे मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम येथे झाला आहे. मात्र कायद्याची माहिती नसल्यामुळे त्यांच्या मृत्युची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात घेण्याचे राहून गेले आहे. अर्जदारास त्यांच्या आईच्या मृत्यु प्रमाणपत्राची गरज भासत असल्यामुळे तो गैरअजर्दाराकडे गेला असता त्याला गैरअर्जदाराच्या कार्यालयात सौ.शशिकला बंडू बळी यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबत कळविले गेले व न्यायालयामार्फत आदेश आणण्याचे सुचित केले. सबब, अर्जदाराला प्रस्तुतचा अर्ज दाखल करावा लागला. गैरअर्जदारास नोटीस काढून म्हणणे मागविले असता गैरअर्जदार नोटीस मिळून देखील न्यायालयात हजर न झाल्याने त्यांच्याविरूध्द प्रस्तुत प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दि.१७.१२.२०२२ रोजी पारीत करण्यात आला.

२. अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या पृष्ठार्थ त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.०९ अन्व्ये अभिलेखावर दाखल केले. तसेच अर्जदाराने अभिलेखावर दैनिक 'पुण्यनगरी' दि.१९ नोव्हेंबर २०२२ रोजीचे वर्तमानपत्रातील अर्जावर हरकत मागविण्याची जाहिरात नि.क्र.०८, गैरअर्जदार यांचे कार्यालयात सौ.शशिकला बंडू बळी यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अनुक्रमे नि.क्र.१३ अन्वये दाखल केले. अर्जदाराने स्वतःचे आधार कार्ड नि.क्र.१२ वर दाखल केले. अर्जदार यांनी

नि.क्र.१० वर पुरावा बंद पुर्सिस दाखल केली. परंतू अर्जदारांना सा.क्र.१ यांच्या पुराव्याच्या पृष्ठार्थ पुरावा देण्यासाठी निर्देशित करण्यात आले. त्यावरून अर्जदाराने त्याच्या पुराव्याच्या पुष्ठार्थ सा.क्र.२ नारायण रामजी बळी यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. त्यात त्यांनी असे कथन केले की, सौ.शशिकला बंडू बळी हया त्यांच्या शेजारच्या रहिवासी होत्या. त्यांचा मृत्यु दि.२६.०३.१९९० रोजी मौजे मालेगांव, ता.मालेगांव जि.वाशिम येथे त्यांच्या राहत्या घरी झाला होता तसेच ते त्यांच्या अंत्यविधीस हजर असल्याचे त्यांनी शपथपत्रात कथन केले.

३. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार शिवाजी बंडू बळी हा मौजे मालेगांव, ता.मालेगांव जि.वाशिम येथील रहिवासी असल्याचे व अर्जदाराची आई सौ. शशिकला बंडू बळी यांचा २६.०३.१९९० रोजी मौजे मालेगांव, ता.मालेगांव जि.वाशिम येथे राहत्या घरी मृत्यु झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नमुद तारखेस अर्जदाराच्या आईची मृत्युची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात घेतली न गेल्याचे निदर्शनास येते. गैरअर्जदार यांनी हजर होवून हरकत घेतलेली नाही व इतर कोणीही त्यांच्या मृत्युची नोंद घेण्याबद्दल आक्षेप घेतलेला नाही. एकंदरित सर्व कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले असता अर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता व उपलब्ध कागदपत्रांच्या अधीन राहून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार, मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय, मालेगांव, ता. मालेगांव जि. वाशिम यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराची आई सौ. शशिकला बंडू बळी यांचा २६.०३.१९९० रोजी मृत्यु झाल्याची नोंद अर्जाप्रमाणे नगर पंचायत, मालेगांव दप्तरी नियमाप्रमाणे व योग्य तो शुल्क भरल्यानंतर घेण्यात यावी.

३. येणेप्रमाणे गैरअर्जदार यांना पत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KULKARNI PRAVIN UMAKANTRAO
Date: 2022.12.17 16:16:24 +0530

दिनांक : १७.१२.२०२२

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२
मालेगांव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer **: Shri. Shivam B. Patange (L.G.)**

| | | |
|---|---|---|
| Court & Judge Name | : | P.U.Kulkarni,<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon. |
| Date of Order | : | 17.12.2022. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 17.12.2022. |
| Order uploaded on | : | 17.12.2022. |